MHRG070014162023

# फौजदारी चौकशी अर्ज क्र.२७१/२०२३

सौ. सीमा संदीप काळण
विरुध्द
श्री. संदीप गोविंद काळण आणि इतर

## निशाणी क्र.१९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी कौटूंबिक हिंसाचार विरोधी कायदा, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी, संरक्षणात्मक आदेश व तसेच घरभाडे मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा प्रेमविवाह दिनांक २२/०५/२००८ रोजी मौजे दहिवली येथे झाला. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना विवाहसंबंधातुन भार्गव नावाचा मुलगा झाला. अर्जदार यांचा प्रेमविवाह झाल्यामुळे सामनेवाला क्र.२ व ३ यांना अर्जदार ही पसंत नव्हती. सामनेवाला क्र.२ व ३ हे अर्जदार हिस शिवीगाळ करायचे. परंतु अर्जदार यांचा प्रेमविवाह असल्याकारणाने त्या सर्व सहन करीत होत्या. अर्जदार यांना विवाहानंतर २ वर्षांनंतर सामनेवाला क्र.१ यांचे बाहेर विवाहबाहय संबंध असल्याचे समजले. अर्जदार यांनी सदर बाबीबद्दल सामनेवाला क्र.१ यांना विचारणा केली असता सामनेवाला क्र.१ ने अर्जदार यांना मारहाण केली. सामनेवाला क्र.१ हे अर्जदार यांना अश्लील शिवीगाळ करायचे. सामनेवाला यांनी अर्जदार यांचे दागिने सुध्दा विक्री केले.

सामनेवाला क्र.१ यांचे विविध महिलांसोबत विवाहबाहय संबंध होते. ज्या ज्या वेळेस अर्जदार यांना त्याबाबत माहिती मिळाली, त्या त्या वेळेस अर्जदार यांनी सामनेवाला यांना त्याबाबत जाब विचारला. त्यावेळेस सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार यांना मारहाण केली. सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदाराच्या माहेरी जाऊन देखील त्यांना शिवीगाळ करीत होते व जीवे मारण्याची धमकी देत होते. अर्जदार यांच्या गरोदरपणात सुध्दा सामनेवाला यांनी अर्जदार यांची शारिरीक व मानसिक काळजी घेतली नाही. याउलट अर्जदार यांचे सर्व स्त्रीधन सामनेवाला यांनी स्वतःच्या मौजमजेसाठी विक्री केले.

०३. दिनांक ०६/०९/२०२३ रोजी अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१ यांच्याविरुध्द समुपदेशन केंद्र, कर्जत येथे तक्रार नोंदविली. तेथे चौकशीकामी सामनेवाला यांना बोलाविण्यात आले असता त्याचा राग येऊन सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदाराचे केस पकडून त्यांच्या कानाखाली मारली. त्यामुळे अर्जदार या बेशुध्द पडल्या व त्यांना दवाखान्यात दाखल केले. त्यानंतर अर्जदार यांचे आई–वडील अर्जदार यांना माहेरी घेऊन गेले. त्यानंतर अर्जदार या त्यांचा मुलगा भार्गव यास घेण्याकरिता सामनेवाला यांच्याकडे गेल्या असता सामनेवाला यांनी मुलाला देण्यास नकार दिला व "आमच्याकडे येऊ नका" अशी धमकी दिली. त्यानंतर अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१ विरुध्द दिनांक २४/०९/२०२३ रोजी नेरळ पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. अर्जदार या असहाय्यपणे त्यांच्या आई–वडीलांवर बोजा बनुन राहत आहेत. अर्जदार यांच्या निवासाची जबाबदारी सामनेवाला क्र.१ यांच्यावर असुन सामनेवाला यांनी अर्जदार यांना भाडयाचे घर घेण्यासाठी सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन ५०,०००/– रुपये, तसेच

दरमहाचे भाडे रक्कम रुपये १०,०००/–, वैद्यकीय उपचारांकरिता रक्कम रुपये १,००,०००/–, अंतरिम पोटगी म्हणुन दरमहा रक्कम रुपये २०,०००/– द्यावेत व संरक्षणात्मक आदेश देण्यात यावा याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०४. सामनेवाला यांनी निशाणी क्र.२४ येथे पुरशीस दाखल करुन सामनेवालांतर्फे निशाणी क्र.१ च्या अर्जास जो जबाब दिला आहे तोच जबाब सदर अर्जाचा जबाब व युक्तीवाद म्हणुन वाचण्यात यावा असे कथन केले आहे. सामनेवाला क्र.१ यांचे कथन आहे की, प्रस्तुत अर्जातील मजकुर खरा व बरोबर नाही. सामनेवाला यांनी कधीही अर्जदार यांना शारिरीक व मानसिक त्रास दिलेला नाही. सामनेवाला क्र.१ यांचे उत्पन्न अत्यल्प आहे याबाबत अर्जदार यांना लग्नापुर्वीपासुन माहिती होती. अर्जदार यांची छानछोकीची हौस, हिंडण्या–फिरण्यासाठी जाण्याची, महागडे पोशाख, हॉटेल, रेस्टॉरंट येथील विविध खाद्यपदार्थांसाठी खर्च करण्याची सामनेवाला क्र.१ यांची ऐपत नाही. सामनेवाला क्र.२ व ३ हे कधीही सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांचेसोबत कायमस्वरुपी राहिले नाहीत. अर्जदार यांनी स्वतःहुन सामनेवाला क्र.१ चा त्याग केला आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा मुलगा भार्गव याचा सांभाळ करण्याची जबाबदारी अर्जदार यांनी सुरुवातीपासुनच नाकारली आहे. अर्जदार यांच्या मागणीमध्ये कोणतेही तथ्य नसल्यामुळे सदर मागण्या फेटाळण्यात याव्यात अशी विनंती सामनेवाला क्र.१ यांनी केली.

०५. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाबाबतचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२१ येथे दाखल केले आहे.

सामनेवाला यांना अनेकदा संधी देऊनही त्यांनी मालमत्ता व दायित्वाबाबतचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले नाही. अर्जदार यांनी त्यांच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तिला कोणतेही उत्पन्न नसल्याबाबत नमुद केले आहे. अर्जदार यांनी सदर अर्जावर युक्तीवाद केला. सामनेवाला व त्यांच्या विधीज्ञांना संधी देऊनही त्यांनी सदर अर्जावर युक्तीवाद केला नाही. सामनेवालातर्फे विधीज्ञांनी निशाणी क्र.२२ वर अर्ज दाखल करुन सामनेवाला हे त्यांना संपर्क करीत नसल्यामुळे त्यांनी सामनेवाला यांना नोटीस पाठविली असे कथन केले आहे व त्याबाबतची कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०६. अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले. अर्जदार यांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत कामी तुर्तातुर्त अर्जाच्या निर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे केलेली आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही सामनेवालांविरुध्द संरक्षणात्मक आदेश मिळण्यास पात्र आहे का ? | **नकारार्थी** |
| २. | अर्जदार या सामनेवालाकडून पालनपोषण, कपडालत्ता व औषधपाणी याकरिता पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | अर्जदार या निवासाची सोय अथवा निवासाच्या भाडयापोटी ५,०००/- रुपये मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी.** |
| ४. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः** |

| | | |
|---|---|---|
| | | <u>मंजूर करण्यात येतो.</u> |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ बाबतः–</u>**

०७. सदर अर्जामध्ये संरक्षण अधिकारी यांचे कार्यालय, कर्जत यांनी कौटूंबिक घटना अहवाल दाखल केला आहे. सदर अहवालामध्ये सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदाराचा कशा प्रकारे हिंसाचार केला या बाबी नमुद आहेत. उपरोक्त विवेचनावरुन सामनेवाला यांनी अर्जदार ही त्यांच्याकडे राहत असताना अर्जदाराचा शारिरीक, मानसिक, आर्थिक व कौटुंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. परंतु, सदरचा अर्ज दाखल केल्यापासुन अर्जदार यांना कोणत्या बाबींसाठी संरक्षण मिळावे व सामनेवाला यांच्या कोणत्या कृतीबाबत संरक्षण मिळावे व कशाप्रकारे सामनेवाला हे अजुनही अर्जदार यांना त्रास देत आहेत याबाबत कोणताही पुरावा सादर केलेला दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार यांना सामनेवालांविरुध्द संरक्षण आदेश द्यावे असे वाटत नाही. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबतः–</u>**

०८. अर्जदार क्र.१ हिने सामनेवालाकडून पालनपोषण, कपडालत्ता व औषधपाणी याकरिता पोटगी म्हणुन दरमहा रक्कम रुपये २०,०००/– सामनेवालांकडून मिळावेत अशी मागणी केली आहे. अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१ हे काय कामकाज करीत आहेत याबाबत कोणतेही कथन त्यांच्या अर्जामध्ये केलेले दिसुन येत नाही अथवा प्रथमदर्शनी कोणताही

कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार यांनी त्यांच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रात त्यांना कोणतेही उत्पन्न नसल्याचे नमुद केले आहे. सामनेवाला क्र.१ यांनी मालमत्ता व दायित्वाबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता असे दिसुन येते की, अभिलेखावर सामनेवाला क्र.१ यांच्या उत्पन्नाबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा दाखल नाही. अर्जदार ही सामनेवाला क्र.१ यांची पत्नी असुन तिचा सांभाळ करणे ही नैतिक जबाबदारी सामनेवाला क्र.१ यांची आहे. सामनेवाला क्र.१ हे सदरची जबाबदारी पार पाडत आहे असे कोणतेही कागदपत्र अभिलेखावर सामनेवाला यांनी दाखल केलेले नाहीत.

०९. सदरचा अर्ज निकाली काढण्यासाठी प्रथमदर्शनी परिस्थिती व पुरावा लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदार ही सामनेवाला यांच्यापासुन विभक्त राहत आहे. सामनेवाला यांच्या उत्पन्नाबाबत कोणतेही कागदपत्र अर्जदार हिने दाखल केलेले नाहीत. तरी सामनेवाला क्र.१ यांच्या कमीत कमी उत्पन्नाचा विचार करता अर्जदार यांना या अर्जाच्या आदेशापासून प्रति महिना रुपये ३,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) देणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.३ बाबतः-</u>**

१०. अर्जदार हिने सामनेवाला यांच्याकडून निवासाची सोय अथवा त्यासाठी घरभाडयापोटी रक्कम रुपये ५,०००/- मिळण्यासाठी मागणी केली आहे. परंतु अर्जदार ही भाडयाने राहत आहे हे दाखविण्याकरिता तिने प्रथमदर्शनी पुरावा म्हणुन कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदार ही घरभाडयाकरिता रक्कम मिळण्यास पात्र नाही. सबब, मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.४ बाबतः–</u>**

११. उपरोक्त विवेचनावरुन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आल्यामुळे मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज हा अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

०२. सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार यांना प्रतिमहा रुपये ३,०००/– (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) तुर्तातुर्त पोटगी म्हणुन प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासुन ते मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत द्यावेत.

०३. प्रस्तुत आदेशाची प्रत उभय पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2025.05.31 17:25:08 +0530

दिनांक २८/०५/२०२५

(ए. एस. वाडकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत,
जि. रायगड